आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१८ मार्च २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- निवडणूक रोख्यांच्या संदर्भातले सर्व तपशील ३ दिवसात जाहीर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे स्टेट बँकेला निर्देश

- काँग्रेस म्हणजे भ्रष्टाचार, लूट, आणि अनुनयाचं राजकारण, तर भाजपा म्हणजे विकास आणि सशक्त भारत, असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- सहा राज्यांच्या गृह सचिवांची बदली करण्याचे केंद्रीय निवडणूक आयोगाचे आदेश, मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदावरुन इक्बाल सिंग चहल यांना तत्काळ हटवण्याचाही आदेश

**आणि**

- स्टार्ट अप्सना गुंतवणूकदार आणि संभाव्य कॉर्पोरेट भागीदाराशी जोडणाऱ्या स्टार्ट अप महाकुंभला नवी दिल्लीत प्रारंभ

**<><><><><>**

निवडणूक रोख्यांच्यासंदर्भातले सर्व तपशील ३ दिवसात जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज स्टेट बँकेला दिले. रोखे खरेदी करणारा आणि हे रोखे वठवणारा राजकीय पक्ष यांची माहिती उघड होईल असा रोख्यांचा क्रमांकही जाहीर करण्याचे आदेश न्यायालयानं दिले. या रोख्यांचे सर्व तपशील स्टेट बँकेला जाहीर करावे लागतील, यात कुठलंही दुमत नसल्याचं सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं आज स्पष्ट केलं.

**<><><><><>**

काँग्रेस म्हणजे भ्रष्टाचार, लूट, आणि अनुनयाचं राजकारण, तर भाजपा म्हणजे विकास आणि सशक्त भारत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज कर्नाटकात शिवमोगा इथं जाहीर सभेत बोलत होते.

आपल्या सत्ताकाळात देशातले २५ कोटी लोक दारिद्र्य रेषेच्या वर आले. कर्नाटकात ७५ लाख लोकांना आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत मोफत वैद्यकीय उपचार मिळाले, ४० लाख गरीब महिलांना एलपीजी गॅस जोडणी, तर ९ लाख लोकांना घरं मिळाली, असं त्यांनी सांगितलं. पुढच्या ५ वर्षाच्या काळात केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ सर्व पात्रयुक्तांना मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. आपल्या १० वर्षांच्या कारभारामुळे देश आज ग्रीन कॉरेडॉर्स, द्रुतगती महामार्ग, वंदे भारत, आणि रेल्वेगाड्या, गतीमान इंटरनेट, युपीआय, आणि मेट्रो सेवांमुळे ओळखला जातो, असं ते म्हणाले. मुंबईत शिवाजी पार्कवर काल झालेल्या इंडिया आघाडीच्या सभेवर मोदी यांनी जोरदार टीका केली.

दरम्यान, या सभेला माजी प्रधानमंत्री एच डी देवे गौडा आणि ज्येष्ठ नेते एच डी कुमारस्वामी यांना आमंत्रित न केल्याबद्दल धर्मनिरपेक्ष जनता दलानं नाराजी व्यक्त केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाच्या चर्चेत ५ जागा दिल्या जाणार होत्या मात्र, आता फक्त २ जागा दिल्या आहेत, असंही पक्षाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

महायुतीचं जागावाटप सन्मानजनक पद्धतीनं आणि समन्वयानं करुन लवकरच ते जाहीर होईल, आणि राज्यात महायुती ४५  पेक्षा अधिक जागा जिंकेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीच्या काल मुंबईत

झालेल्या सभेत उपस्थित नेत्यांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव दिसत होता, अशी टीका त्यांनी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करणाऱ्यांना २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत जनतेनं जागा दाखवून दिली, तशी यावेळीही दाखवेल, असं ते म्हणाले.

<><><><><>

महायुतीच्या बैठका आज आणि उद्या होणार असून लवकरच सर्व जागा जाहीर होतील, अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात दिली. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी भाजपमध्ये प्रवेश केला नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी प्रत्येकी २ बूथला भेट देणार आहेत, यात केंद्र सरकारच्या २४ योजनांची माहिती दिली जाणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

शिवसेनेचा विश्वासघात करणाऱ्यांना आगामी लोकसभा निवडणुकीत धडा शिकवण्याचं आवाहन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना केलं आहे. ते आज हिंगोली जिल्ह्यात वसमत इथं आयोजित सभेत बोलत होते. आम्ही सत्तेचे भुकेले नाही, जनतेची सेवा करणारे सेवक आहोत. तेव्हा आम्हाला लुबाडून राज्य करू नका. शिवसेनेचं पक्षचिन्ह चोरणाऱ्या गद्दार पक्षाला निवडून देऊ नका, असं, ते म्हणाले.

<><><><><>

राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं आज बिहारमधल्या जागावाटपाची घोषणा केली. यात लोकसभेच्या ४० पैकी १७ जागा भाजपा लढवणार असून संयुक्त जनता दल १६, तर लोक जनशक्ती पार्टी ५ जागा लढवणार आहेत. माजी मुख्यमंत्री जितन राम

मांझी यांचा हिंदुस्थानी अवामी मोर्चा आणि उपेंद्र कुशवाह यांचा राष्ट्रीय लोक मोर्चा यांना राज्यात प्रत्येकी एक जागा दिली आहे. भाजपा महासचिव विनोद तावडे यांनी नवी दिल्लीत ही माहिती दिली.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या गृह सचिवांची बदली करण्याचे आदेश त्या राज्यांच्या मुख्य सचिवांना दिले आहेत. हिमाचल प्रदेश आणि मिझोरमच्या सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांची बदली करण्याचेही आदेश आयोगानं दिले आहेत. याशिवाय पश्चिम बंगालच्या पोलिस महासंचालकांची बदली करण्याचे आदेशही आयोगानं दिले होते. त्यानुसार पश्चिम बंगालचे नवे पोलिस महासंचालक म्हणून विवेक सहाय यांची नियुक्ती झाली आहे. त्यांच्या आधी या पदावर काम करणाऱ्या राजीव कुमार यांची नेमणूक माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या अतिरीक्त सचिव पदावर झाली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदावरुन इक्बाल सिंग चहल यांना तत्काळ हटवण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगानं दिले आहे. याशिवाय स्वतःच्या मूळ जिल्ह्यात किंवा ३ वर्षांपेक्षा अधिक काळासाठी एकाच ठिकाणी कार्यरत असलेले महापालिका आयुक्त, अतिरीक्त महापालिका आयुक्त, महापालिकेचे उपायुक्त यांचीही बदली करण्याचे आदेश निवडणूक आयोगानं दिले आहे. या सर्व बदल्यांची माहिती उद्या संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कळवण्याच्या सूचना केंद्रीय निवडणूक आयोगाचे सचिव एस. के. दास यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात दिल्या आहेत.

यासंदर्भात निवडणूक आयोगानं २२ फेब्रुवारी रोजी पत्र पाठवूनही संबंधितांच्या बदल्या केल्या नाही, त्याबद्दल निवडणूक आयोगानं स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली आहे.

**<><><><><><>**

देशातल्या स्टार्ट अप्सना विविध प्रकारचे गुंतवणूकदार आणि संभाव्य कॉर्पोरेट भागीदार यांच्याशी जोडणाऱ्या तीन दिवसीय स्टार्ट अप महाकुंभला आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथे सुरुवात झाली. जेव्हा २०१६ साली देशात हा उपक्रम सुरु झाला तेव्हा स्टार्ट अप्सची संख्या ३०० होती आणि आता ती एक लाखावर जाऊन पोहोचली आहे, असं डी पी आय आय टी सचिव राजेश कुमार सिंह यांनी याप्रसंगी बोलताना सांगितलं.

येत्या काही महिन्यांमध्ये स्वतंत्र समर्पित डीप टेक धोरण निश्चित केलं जाईल, असं ते म्हणाले. तसंच सर्व हितसंबंधियांची आकडेवारी असणारी भारत स्टार्ट अप इकोसिस्टिम रजिस्ट्री तयार केल्याचं त्यांनी सांगितलं.

या कार्यक्रमात एआय, बीटूबी, एग्रीटेक, डीपटेक, क्लायमेट टेक, गेमिंग, ई-स्पोर्ट्स , फिनटेक अशी अनेक विशेष दालनं आहेत. १० देशांमधले २ हजार स्टार्ट अप्स, ३० हजार भावी उद्योजक, आणि सुमारे पाचशे इन्क्युबेटर्स आणि शिष्टमंडळं या कार्यक्रमात सहभागी झाली आहेत.

**<><><><><><>**

२०२३ सालच्या बिर्ला सरस्वती सन्मान पुरस्कारासाठी विख्यात मल्याळी कवी प्रभा वर्मा यांची निवड करण्यात आली आहे. रौद्र सात्विकम या काव्यसंग्रहाबद्दल तसंच २०१३ ते २०२२ या काळातल्या साहित्य क्षेत्रातल्या योगदानाबद्दल त्यांना

हा पुरस्कार जाहीर झाला आहे. मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि पंधरा लाख रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**<><><><><><>**

डुंगरपूर प्रकरणी उत्तरप्रदेशाचे माजी मंत्री आझम खान यांना रामपूर न्यायालयानं ७ वर्ष तुरुंगवास आणि ८ लाख रुपये दंड ठोठवला आहे. त्यांच्यासह ४ जणांना तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा न्यायालयानं आज सुनावली, तर इतर ३ आरोपींची मुक्तता केली.

**<><><><><><>**

ऑस्ट्रेलियात येत्या ६ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या पाच सामन्यांच्या पुरूष हॉकी मालिकेसाठी हॉकी इंडियानं २७ जणांची नावं जाहीर केली आहेत. पर्थ इथं सुरू होणाऱ्या या ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि उपकर्णधार हार्दिक सिंग असणार आहे. हा दौरा आगामी पॅरीस ऑलिम्पिक २०२४ च्या तयारीसाठी महत्वाचा असणार आहे.

**<><><><><><>**

आपला उमेदवार कोणत्याही अडचणीत सापडू नये यासाठी राजकीय पक्षांनी नियमांचं काटेकोर पालन करावं, असं आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे. त्यांनी आज मुंबईत मंत्रालयात नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातल्या मतदानाचं वेळापत्रक, निवडणुकीसाठी विविध पातळ्यांवरची सज्जता, याविषयी सविस्तर माहिती त्यांनी राजकीय प्रतिनिधींना दिली.

**<><><><><><>**

तेलंगणा निवडणूक अधिकाऱ्यांनी  या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी सुधारण्यासाठी कृती आराखडा तयार केला असल्याची माहिती तेलंगणाचे मुख्य निवडणूक आयुक्त विकास राज यांनी आज हैदराबाद इथं बातमीदारांशी बोलताना दिली.

**<><><><><><>**

गेल्या २४ तासांमध्ये विदर्भात तुरळक ठिकाणी गारा पडल्या असून काही ठिकाणी घोंगावणारा वारा होता. तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात हवामान कोरडे होते.

येत्या दोन दिवसांमध्ये विदर्भात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा, आणि गारा पडण्याची शक्यता आहे.

येत्या ४ दिवसात, पश्चिम बंगालमधल्या गंगेच्या खोऱ्यात तसंच ओदिशामधे तुरळक ते मध्यम स्वरूपाचा पाऊस वादळी वाऱ्यासह पडण्याची शक्यता, हवामान विभागानं व्यक्ते केली आहे.

**//<><><><><><>//**